अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संवर्गात तदर्थ पदोन्नतीने पदस्थापना देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

शासन आदेश क्रमांक : मविसे-१०१८/प्र.क्र.२६/२०१८/आस्था-३,

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, मुंबई - ४०० ००१.

दिनांक: ०४ सप्टेंबर,२०१९.

शासन आदेश :-

महाराष्ट्र विकास सेवा गट-अ मधील निवडश्रेणी उप मुख्य कार्यकारी अधिकारी या संवर्गातील खालील अधिकाऱ्यांना या आदेशान्वये अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी / प्रकल्प संचालक पदावर (वेतनस्तर एस-२५ ७८८००-२०९२००) तदर्थ पदोन्नतीने खालील तक्त्यात त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र.३ मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी पदस्थापना देण्यात येत आहे:-

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नाव, सध्याचे पदनाम व ठिकाण	तदर्थ पदोन्नतीने पदस्थापनेचे ठिकाण	**शेरा**
(१)	(२)	(३)	(४)
१.	श्री.डी.एन.चव्हाण, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा व स्वच्छता), जिल्हा परिषद सिंधुदूर्ग	प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा सिंधुदूर्ग	रिक्त पदी.

२. वरील अधिकाऱ्यांना देण्यात आलेली तदर्थ पदोन्नती ही खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे :-

१) सदर तदर्थ पदोन्नती केवळ ११ महिन्यांसाठी देण्यात येत आहे. सदर तदर्थ पदोन्नतीवर कायम स्वरुपी धारणाधिकार राहणार नाही.

२) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी / उप आयुक्त / प्रकल्प संचालक या संवर्गातील प्रतिनियुक्तीवर कार्यरत अधिकारी मूळ संवर्गात प्रतिनियुक्तीवरुन परत आल्यास आवश्यतेनुसार निवड सूचीतील कनिष्ठतम अधिकाऱ्यास पदावनत करण्यात येईल.

३) वरील अधिकाऱ्यांना देण्यात येणारी तदर्थ पदोन्नती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहील.

४) सदर तदर्थ पदोन्नती मा .उच्च न्यायालय, मुंबई येथे प्रलंबित असलेल्या रिट याचिका क्र.८४५२/२००४ मधील T.A. १/२०१४ आणि T.A. २/२०१४ तसेच रिट याचिका क्र.२७९७/२०१५ न्यायालयीन प्रकरणामध्ये होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहील.

५) सदर पदोन्नती आस्थापना मंडळ क्र.२ च्या बैठकीच्या इतिवृत्तामधील नमूद अटी व शर्तींच्या अधीन राहून व मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट याचिका क्र.२७९७/२०१७ (स्टॅम्प क्र.७२५६/२०१५) महाराष्ट्र राज्य विरुध्द विजय घोगरे व इतर तसेच इतर संलग्न न्यायालयीन प्रकरणात दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेला अंतिम निर्णय व त्याविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका (डायरी क्र.३३१५१/२०१७) या याचिकेबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

३. संबंधित विभागीय आयुक्त / मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी तदर्थ पदोन्नतीने नियुक्ती देण्यात आलेल्या वरील अधिकाऱ्यांना स्थानिक पर्यायी व्यवस्था करुन , तात्काळ कार्यमुक्त करावे आणि नवीन नियुक्तीच्या ठिकाणी तात्काळ हजर होण्याबाबत संबंधितांना सूचना द्याव्यात . तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी पदभार स्वीकारल्यानंतर त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

४. तदर्थ पदोन्नतीने नियुक्ती दिलेल्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ रुजू व्हावे. त्यांनी अनधिकृत रजेवर जाऊ नये. यासंदर्भात त्यांचे लक्ष सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.सीडीआर-१०८२/२५६७/२८/११, दिनांक ३०.८.१९८२ अन्वये दिलेल्या सूचनांकडे वेधण्यात येत आहे.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९०४११२७५३७५२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ananda Shankar Shendage

Digitally signed by Ananda Shankar Shendage
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0db7067f83b51744741b4485650edc8705560188be635df819605b4913ead056, serialNumber=dced31ba3ba0e455430f67304905c6e3544dae39602268d4cf2844818a1f80a4, cn=Ananda Shankar Shendage
Date: 2019.09.04 21:58:44 +05'30'

(आ.शं.शेंडगे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,

२) मा.मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव,

३) मा.राज्यमंत्री (ग्राम विकास) खाजगी सचिव,
४) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने),
५) मा.सचिव (ग्राम विकास व पंचायत राज) यांचे स्वीय सहायक,
६) विभागीय आयुक्त, कोकण,
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,सिंधुदूर्ग,
८) मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद,सिंधुदूर्ग,
९) महालेखापाल- १ , (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
१०) जिल्हा कोषागार अधिकारी, सिंधुदूर्ग
११) संबंधित अधिकारी (संबधित विभागीय आयुक्त / मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यामार्फत),
१२) सामान्य प्रशासन विभाग, (कार्यासन-१२/कार्यासन-१६ ब), मंत्रालय, मुंबई,
१३) कार्यासन क्रमांक आस्था-२, ग्रामविकास विभाग,
१४) निवड नस्ती, का.क्र. आस्था-३, ग्रामविकास विभाग.